माहितीचा
अधिकार

सत्यमेव जयते

**महाराष्ट्र शासन**

**वित्त विभाग**

# संचालनालय, लेखा व कोषागारे

**"कस्तुरी" इमारत, तळ मजला, जे. टाटा मार्ग, पेट्रोलियम हाऊस समोर, चर्चगेट, मुंबई ४०००२०.**

**दुरध्वनी क्रमांक: ०२२-२२६२२०३६ ई-मेल : aaomahapardat.mu-mh@gov.in**

**पहा :** १. महाराष्ट्र शासन वित्त विभाग अधिसुचना दि.३०.०१.२०१९

*****************************************************************************************************************

क्र.संलेको ०६.२०२५/गोअक/कले -२/वे.वा.जुलै -२०२५/352 दि. 16.07.2025

## परिपत्रक

महाराष्ट्र वित्त व लेखा सेवेच्या लेखाधिकारी ते संचालक संवर्गातील प्रतिनियुक्तीच्या पदावरील अधिकाऱ्यांचे वार्षिक वेतनवाढीचे आदेश संचालनालयाच्या स्तरावरुन निर्गमित करण्यात येतात.

महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारित वेतन) नियम २०१९, नियम क्र.१०(३) मधील तरतुदींनूसार,वेतनवाढ अनुज्ञेयतेकरीता सहा महिने एवढी अर्हताकारी सेवेची पूर्तता अनिवार्य आहे. त्यानुसार ज्या शासकीय कर्मचाऱ्यांची दि.०१ जुलै २०२५ ह्या तारखेपूर्वी सहा महिने इतकी अर्हताकारी सेवा पूर्ण झाली आहे व जे दि.०१ जुलै या तारखेला कर्तव्यावर हजर आहेत अशा अधिकाऱ्यांना दि.०१ जुलै रोजीची वार्षिक वेतनवाढ अनुज्ञेय आहे.

यास्तव, प्रतिनियुक्तीच्या पदावरील लेखाधिकारी ते संचालक संवर्गातील अधिकाऱ्यांनी उपरोक्त अधिसुचनेत नमूद केलेल्या अटी व शर्तीनुसार संबंधित विभागप्रमुख / कार्यालयप्रमुख यांनी प्रमाणित केलेले उपस्थितीबाबतचे प्रमाणपत्र (सोबतच्या नमुन्यानुसार) संचालनालयास तात्काळ aaomahapardat.mu-mh@gov.in या ईमेल आयडी वर व मूळ प्रमाणपत्र संचालनालयास पाठविण्यात यावे. जेणेकरून जुलै २०२५ च्या वार्षिक वेतनवाढीचे आदेश निर्गमित करणे शक्य होईल.

सोबत - वरीलप्रमाणे

**(रश्मी नांदिवडेकर)**
**सहसंचालक (प्रशासन)**
**लेखा व कोषागारे, मुंबई**

## दि.०१ जुलै २०२५ ची वार्षिक वेतनवाढ मंजुर करण्यासाठी आवश्यक प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, ----------------------------------------- या कार्यालयात कार्यरत असलेले/असलेल्या श्री/श्रीम. ---------------------------------------------(पदनाम) हे/ह्या महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारित वेतन) नियम २०१९ मधील नियम १० अन्वये वार्षिक वेतनवाढीसाठी आवश्यक अर्हताकारी सेवा कालावधीची पुर्तता करीत आहेत.

कार्यालय प्रमुख/विभागप्रमुखाची स्वाक्षरी